अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । शुक्रवार
३०.१०.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २७० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

थोडक्यात

उड्डाणपुलाच्या कामादरम्यान मातीचा ढिगारा कोसळला : एक कामगार ठार, एक गंभीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

पुणे – जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील बिजवडी येथे उड्डाणपुलाच्या कामा दरम्यान मोठी दुर्घटना घडली. पुलाच्या कामासाठी करण्यात येत असलेला मातीचा मोठा ढिगारा अचानक कोसळल्याने दोन बांधकाम कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या दुर्घटनेत एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा कामगार गंभीर जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, घटनास्थळी एकूण पाच कामगार काम करत होते. अपघाताच्या वेळी त्यापैकी दोन कामगार नाश्ता करण्यासाठी गेले होते, तर एक कामगार कामाच्या ठिकाणापासून काही अंतरावर उभा होता.

एमपीएससी परीक्षा घोटाळा प्रकरण

न्या.भोसले यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाकडून सुनावणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) नऊ परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि गैरप्रकारांची चौकशी करणारा पाच सदस्यीय आयोग पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी खुली सुनावणी घेणार आहे. महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त आणि आयोगाचे सदस्य सचिव तुकाराम मुंढे यांनी ही माहिती दिली.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती आणि निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालील या आयोगाची पहिली बैठक २८ ऑक्टोबर रोजी झाली. या बैठकीत चौकशीची प्रक्रिया निश्चित करण्यात आली.

आयोगाने सुनावणी खुल्या पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे. या कामकाजाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या व्यक्तींना उपस्थित राहता येईल; मात्र त्यांना कामकाजात हस्तक्षेप करता येणार नाही, असे मुंढे यांनी सांगितले. निष्पक्ष, न्याय्य आणि पारदर्शक चौकशी सुनिश्चित करणे हा यामागील उद्देश असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. परीक्षांमधील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या आरोपांनंतर ही चौकशी सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे पुण्यात एमपीएससीच्या उमेदवारांनी सलग ११ दिवस आंदोलन केले होते. त्याचे परिणाम राज्यात उमटले. या गैरप्रकारांना जबाबदार असलेल्यांवर कारवाई करण्यासह संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी उमेदवारांनी केली होती.

विशेषतः २०२५ मधील औषध निरीक्षक परीक्षेच्या भरती प्रक्रियेवरही या वादामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. प्रश्नपत्रिका, उत्तरतालिका किंवा त्यांमधील काही भाग कथितरीत्या फुटल्याच्या प्रकरणांची आयोग चौकशी करणार आहे. तसेच एमपीएससीचे विद्यमान आणि माजी अध्यक्ष व सदस्यांची भूमिका तपासली जाणार आहे. परीक्षांमधील अनियमिततेसाठी कोण जबाबदार आहे आणि संबंधितांवर पुढील कारवाई करण्याची आवश्यकता आहे का, याचाही आयोगाकडून आढावा घेतला जाईल. या परीक्षांशी संबंधित माहिती असलेल्या उमेदवारांना, विद्यार्थ्यांना, व्यक्तींना आणि नोंदणीकृत संस्थांना आयोगाने १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रतिज्ञापत्रे सादर करण्याचे आवाहन केले आहे. संबंधित प्रतिज्ञापत्रे मराठी किंवा इंग्रजी भाषेत सादर करता येतील. त्यासोबत वैध ओळखपत्र आणि संबंधित कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

मुंबईत व्यंगचित्रकारांच्या कलेचे स्वतंत्र दालन उभारणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – महाराष्ट्रातील व्यंगचित्रकलेचा समृद्ध वारसा जपण्यासाठी मुंबईत व्यंगचित्रकारांच्या कलाकृतींचे स्वतंत्र दालन उभारण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून शासन यासाठी पुढाकार घेईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक सभागृहात आयोजित 'महाराष्ट्राच्या हास्यरेषा' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते.

या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, ग्रंथाली प्रकाशनचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि पुस्तकाचे संपादक व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी उपस्थित होते. व्यंगचित्रकला ही प्रभावी अभिव्यक्तीचे माध्यम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, व्यंगचित्रकला ही शब्दांचा वापर न करता प्रभावीपणे भाष्य करण्याची कला आहे. समाजातील घडामोडी, विरोधाभास आणि विविध विषयांवर मराठी व्यंगचित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून सातत्याने भाष्य केले आहे. व्यंगचित्रातून एखाद्या व्यक्तिमत्त्वाचे आणि परिस्थितीचे वेगळे पैलू समोर येतात. महाराष्ट्राच्या मातीत ही कला अनेक वर्षांपासून जोपासली जात आहे. हा वारसा भावी पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी 'महाराष्ट्राच्या हास्यरेषा' हे पुस्तक महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

उद्धव ठाकरे यांनी सांगितले व्यंगचित्रकलेचे महत्त्व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यंगचित्रकलेतील 'रीडिंग इन बिटवीन द लाइन्स' अर्थात रेषांमधील अर्थ समजून घेण्याचे महत्त्व स्पष्ट केले. व्यंगचित्रकार म्हणून काम करताना आलेले अनुभव आणि 'फटकारे' या पुस्तकाच्या निर्मितीचा प्रवास त्यांनी सांगितला. व्यंगचित्रकार समाजातील विसंगती अचूकपणे टिपून ती आपल्या कलेतून मांडत असतो, असेही त्यांनी नमूद केले.

म्हाडाच्या बांधकामस्थळी क्रेन कोसळून दोन मजुरांचा मृत्यू, दोघे जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नागपूर – नागपूरमधील गणेशपेठ परिसरात म्हाडाच्या इमारतीच्या बांधकामस्थळी भीषण अपघात झाला आहे. काम सुरू असताना सुमारे १०० फूट उंच क्रेनचा वरचा भाग अचानक तुटून खाली कोसळला. या दुर्घटनेत चार मजूर जखमी झाले होते. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाल्याच्या वृत्ताला पोलीस अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे. तर अन्य दोघे जखमी असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नागपूरमधील गणेशपेठ भागातील म्हाडाच्या निर्माणाधिन इमारतीत काम सुरू असताना क्रेन कोसळल्याची घटना घडली आहे. क्रेनचा वरचा भाग कोसळून झालेल्या अपघातात ४ जण जखमी असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. म्हाडाने काम शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले असून काम सुरू असताना हा अपघात घडलाय. सुमारे १०० फूट उंच असलेल्या क्रेन चा वरचा भाग तुटून कोसळला. क्रेन काम करत असताना कोसळल्याने क्रेनवर काम करणारे मजदूर अपघातावरून खाली पडले. जखमी ४ मजुरांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. त्यापैकीच दोघेजण गंभीर असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, म्हाडाने या इमारतीच्या बांधकामाचे कंत्राट शिर्के कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले आहे. शुक्रवारी बांधकामाचे काम सुरू असताना क्रेनचा वरचा भाग अचानक तुटून कोसळला. यावेळी क्रेनवर काम करणारे मजूर खाली पडल्याने हा अपघात घडला. दुर्घटनेनंतर जखमी मजुरांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. मात्र, उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या दुर्घटनेमुळे बांधकामस्थळावरील कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

जळगाव-भुसावळ महामार्गावर नशिराबादमध्ये दोन ट्रकची समोरासमोर धडक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

केबिनमध्ये तासभर अडकलेल्या चालकाचा दुर्दैवी अंत ठार, दुसरा गंभीर

जळगाव – जळगाव-भुसावळ महामार्गावर नशिराबादजवळील मकरा फटाक्यांसमोर मध्यरात्री दोन ट्रकची समोरा-समोर भीषण धडक झालीय.

या भीषण अपघातात सोयाबीन वाहतूक करणाऱ्या ट्रकचा चालक रमेश यादव यांचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या ट्रकचा चालक गंभीर जखमी झाला आहे. अपघातानंतर रमेश यादव हे ट्रकच्या केबिनमध्ये तब्बल एक तास अडकून पडले होते. त्यांना बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले, मात्र रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांना मृत घोषित करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचं पथक घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी पुढील कारवाई सुरु केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक क्रमांक चक ४० इन्ड ६२८७ हा सोयाबीन घेऊन गुजरातहून नागपूरच्या दिशेने जात होता. रात्री अकरा वाजेच्या सुमारास नशिराबादजवळील मकरा फटाक्यांसमोर या ट्रकची समोरून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकशी जोरदार धडक झाली. दुसरा ट्रक दीपनगर येथून राख भरून नाशिकच्या दिशेने जात असल्याची माहिती आहे. हा ट्रक मुक्तचर अली (रा.मध्य प्रदेश) चालवत असल्याचे सांगण्यात आले आहे.

या धडकेत सोयाबीन वाहतूक करणाऱ्या ट्रकचा चालक रमेश यादव केबिनमध्ये अडकले. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांनी धाव घेतली. अखेर क्रेनच्या सहाय्याने ट्रक ओढून आणि हलवून तब्बल एक तासाच्या प्रयत्नांनंतर रमेश यादव यांना बाहेर काढण्यात यश आले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना जळगाव जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

सारसबागेसमोर ३ दिवसांपासून उभ्या असलेल्या कारमधून दुर्गंधी, नागरिकांना संशय, पोलिसांनी दार उघडलं, कुजून फुगलेला मृतदेह बघून सगळेच हादरले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

पुणे – पुण्यातील सारसबाग परिसरात एका कारमध्ये तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. घटनास्थळी पोलिस दाखल झाले असून तपास सुरू केला आहे. अल्टो गाडीत मृतदेह आढळला आहे. सदर व्यक्तीचा खून झाल्याचा पोलिसांना संशय आहे. तीन दिवसापूर्वी मृत्यू झाला असून, आज गाडी असलेल्या परिसरात दुर्गंधी येऊ लागल्याने घटना उघड झाली आहे. मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या अंगावर मारहाणी खूणा आहेत. गेल्या दोन-तीन दिवसांपासून नेहरू स्टेडियमसमोरील रस्त्यावर एक चारचाकी वाहन उभे होते. संबंधित कारमधून अचानक तीव्र दुर्गंधी येऊ लागल्याने परिसरातील नागरिकांना संशय आला. पुण्यातील अत्यंत गजबजलेल्या सारसबाग परिसरातील नेहरू स्टेडियमसमोर ही घटना उघडकीस आली आहे. एका बंद कारमध्ये ३० ते ३५ वयोगटातील तरुणाचा मृतदेह आढळल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. तो काळेपडळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे.

‘नागपूरमधील पराभवाची जबाबदारी स्वीकारतो’ : चंद्रशेखर बावनकुळे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

पुणे – नागपूर आणि पुणे या दोन्ही जागा भाजपसाठी प्रतिष्ठेच्या होत्या. नागपूरमधील पराभवाची जबाबदारी स्वीकारत, त्याची कारणे शोधून चुका सुधारण्याचा प्रयत्न केला जाईल, असे भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी

गुरुवारी पुण्यात माध्यमांशी बोलताना सांगितले. नागपूर आणि पुणे या दोन्ही जागा भाजपसाठी प्रतिष्ठेच्या होत्या. नागपूरमधील पराभवाची जबाबदारी स्वीकारत, त्याची कारणे शोधून चुका सुधारण्याचा प्रयत्न केला जाईल, असे भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी पुण्यात माध्यमांशी बोलताना सांगितले. महायुतीतील घटकांच्या कामगिरीचाही आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी रवींद्र धंगेकर यांच्या वक्तव्यावर टीका केली. धंगेकर यांनी संयम बाळगावा आणि एकनाथ शिंदे यांनी त्यांना समज द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. ईव्हीएम आणि मतदार यादीबाबत बोलताना, भाजप बॅलेट पेपरवरील निवडणुकांतही विजयी झाला असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. विजय झाला की ईव्हीएम चांगले आणि पराभव झाला की मशीन खराब, अशी भूमिका योग्य नसल्याचे ते म्हणाले. मतदार यादी पूर्णपणे रद्द करून नव्याने तयार करण्याच्या भूमिकेशी असहमती दर्शवत, याबाबत निवडणूक आयोगाला पत्र लिहिणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या कर्जत दौऱ्याबाबत बोलताना, राज्यात विविध ठिकाणी विकास प्रकल्प उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. मात्र, विकासासोबत वृक्षसंवर्धनही महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. शेतकऱ्यांना दिली जाणारी पाच हजार रुपयांची रक्कम अंतिम मदत नसून अग्रीम मदत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तापमान

	कमाल	किमान
अमरावती	२९	२४
यवतमाळ	२८	२१
अकोला	२७	२४
वाशिम	२८	२३
बुलढाण	२७	२२
वर्धा	३०	२३
नागपूर	२९	२४
चंद्रपुर	२९	२५
गडचिरोली	२८	२३

मालेगाव महापालिकेत एसीबीची मोठी कारवाई

आयुक्तासह उद्यान अधीक्षक ताब्यात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मालेगाव – मालेगाव मनपातील कथित लाचखोरीच्या प्रकरणात नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई केली आहे. महापालिका आयुक्त रवींद्र जाधव आणि उद्यान अधीक्षक नीलेश पाटील यांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. कब्रस्तानातील गवत काढण्याच्या कामांशी संबंधित कंत्राटदाराची बिले मंजूर करण्यासाठी चार टक्के लाचेची मागणी केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या कारवाईमुळे महापालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, दोन वेगवेगळ्या कामांची एकूण २० लाख रुपयांची बिले मंजूर करण्याच्या प्रक्रियेत लाचेची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे. संबंधित कंत्राटदाराने याबाबत नाशिक एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने विभागाने कारवाई केल्याचे सांगण्यात येत आहे.

कब्रस्तान परिसरातील गवत काढण्याच्या कामांच्या ठेक्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांची चौकशी आता महत्त्वाची ठरणार आहे. लाचेची नेमकी किती रक्कम मागण्यात आली, प्रत्यक्ष रक्कम स्वीकारली गेली का आणि कारवाईदरम्यान कोणते पुरावे मिळाले, याबाबत अधिकृत तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही. मात्र, केवळ एसीबीची कारवाई झाल्यामुळे निवृत्तिवेतन किंवा अन्य लाभ आपोआप रोखले जात नाहीत. त्याबाबत संबंधित नियम, विभागीय निर्णय आणि पुढील कायदेशीर प्रक्रियेनुसार निर्णय घेतला जाऊ शकतो. या प्रकरणात एसीबीच्या अधिकृत निवेदनानंतर कारवाईचे स्वरूप, आरोपांचे तपशील आणि पुढील कायदेशीर कार्यवाही स्पष्ट होणार आहे. संबंधितांवरील आरोप सिद्ध झालेले नसून, तपासानंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होईल.

सेवानिवृत्तीच्या एक दिवस आधी कारवाई या प्रकरणातील महत्त्वाची बाब म्हणजे आयुक्त रवींद्र जाधव हे ३० ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त होणार होते. सेवानिवृत्तीच्या अवघ्या एक दिवस आधी त्यांच्यावर एसीबीची कारवाई झाल्याने प्रशासकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. या प्रकरणाचा त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरच्या लाभांवर काय परिणाम होणार, याकडेही लक्ष लागले आहे.

ध्वजारोहणासाठी गोदाकाठ सजला : राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी डीएमएक्स पिक्सेल थ्रीडी मॅपिंगसह आकर्षक रोषणाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नाशिक – सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये होणाऱ्या ध्वजारोहण सोहळ्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू येणार असून त्यांच्या आगमनाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. या ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वाच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी गोदावरी नदीकाठ परिसराला आकर्षक विद्युत रोषणाईने सजविण्यात येत आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून डीएमएक्स पिक्सेल थ्रीडी मॅपिंगच्या माध्यमातून परिसराला नवे भव्य स्वरूप

देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. धार्मिक परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि आधुनिक प्रकाशयोजना यांचा सुंदर संगम या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.

रामकुंडावर भव्य व्यासपीठ; प्रशासनाची लगबग गोदावरीच्या रामकुंड परिसरात ध्वजारोहण सोहळा आणि गोदा महाआरतीसाठी भव्य व्यासपीठांची उभारणी करण्यात येत आहे. परिसरातील मंदिरांची रंगरंगोटी, घाटांचे सुशोभीकरण, विद्युत रोषणाई आणि कार्यक्रमस्थळाकडे जाणाऱ्या मार्गांची व्यवस्था यावर भर देण्यात आला आहे. सोहळ्यासाठी नागरिकांना बसण्याची व्यवस्था, कार्यक्रमाचे थेट दर्शन घडविण्यासाठी स्क्रीन तसेच गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

परिसरातील दुकाने, प्रमुख रस्ते बंद दरम्यान, ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून विविध नियोजनात्मक उपाययोजना केल्या जात आहेत. सोहळ्याच्या वेळी मोठ्या संख्येने भाविक, साधू-महंत, मान्यवर आणि नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन परिसरातील दुकाने बंद ठेवणे तसेच प्रमुख रस्ते कार्यक्रमाच्या तीन दिवस आधीच वाहतुकीसाठी बंद करण्याचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती समोर आली आहे.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००

ठाकरेंपेक्षा १०० पटींहून अधिक निधी शिंदेसेनेला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या अहवालानुसार, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला सुमारे १३९.९२ कोटी रुपयांचा निधी मिळाला. याउलट, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना (उबाठा) पक्षाला सुमारे १.२५ कोटी रुपये आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला सुमारे १.५० कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे.

या आकडेवारीनुसार, शिंदे यांच्या पक्षाला उद्धव यांच्या पक्षापेक्षा सुमारे ११२ पट आणि राज ठाकरे यांच्या पक्षापेक्षा सुमारे ९३ पट अधिक निधी मिळाला आहे. तथापि, दोन्ही ठाकरे बंधूंच्या पक्षांना मिळालेला निधी एकत्र केल्यास तो सुमारे २.७५ कोटी रुपये होतो. या हिशोबाने, शिंदे यांच्या पक्षाला दोघांच्या एकूण निधीच्या तुलनेत सुमारे ५१ पट अधिक रक्कम मिळाली आहे. ही माहिती तिन्ही पक्षांनी ‘फॉर्म-२४ए’ अंतर्गत दिलेल्या आकडेवारीवरून समोर आली आहे. निवडणूक आयोगाला सादर केल्या जाणाऱ्या फॉर्म-२४ए अहवालात सामान्यतः २०,००० रुपयांपेक्षा अधिकच्या देणग्यांचा तपशील दिला जातो. शिंदेंच्या शिवसेनेला कोणाकडून सर्वाधिक निधी पक्षाने निवडणूक आयोगाला दिलेल्या तपशिलानुसार, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळालेल्या मोठ्या देणग्यांमध्ये कन्स्ट्रक्शन आणि इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील कंपन्यांचा समावेश आहे. या तीन मोठ्या देणग्यांची एकूण बेरीज ७५ कोटी रुपये आहे.

कराडमध्ये पाणी कपात : दिवसातून एकदाच तासभर पाणीपुरवठा, 30 ऑक्टोबरपासून अंमलबजावणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

कराड – कराड शहरातील पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन नगरपालिकेने पाणीपुरवठ्यात कपात करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ३० ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर या कालावधीत दिवसातून एकदाच एक तास पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. त्यानंतर ५ ते ११ नोव्हेंबरदरम्यान दिवसातून दोन वेळा पाणीपुरवठा केला जाईल. मात्र, १२ नोव्हेंबरपासून पुन्हा दिवसातून एकदाच एक तास पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात

आले आहे.

नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कराड शहराची लोकसंख्या सुमारे एक लाख १५ हजार असून, शहराला दररोज सुमारे दोन कोटी १६ लाख लिटर पाणीपुरवठा केला जातो. सध्याची पाणीटंचाई लक्षात घेऊन शासनाने नगरपालिकांना पाणीपुरवठ्यात दहा टक्के कपात करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार कराड नगरपालिकेने हा निर्णय घेतला आहे.

यावेळी नगराध्यक्ष यादव म्हणाले, भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन नगरपालिका चार नवीन पाण्याचे टँकर मागवत आहे. तसेच पाण्याचा अपव्यय करणाऱ्या नागरिकांना प्रथम नोटीस बजावण्यात येईल. त्यानंतरही पाण्याची नासाडी सुरू राहिल्यास संबंधितांना एक हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.

सूपर स्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे साडेचार वर्षांच्या बालकावर यशस्वी कॉक्लियर इंप्लांट शस्त्रक्रिया

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे सातवी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया दिनांक २२ ऑक्टोबर २०२६ रोजी यशस्वीरित्या पार पडली. साडेचार वर्षांच्या जन्मतः श्रवणदोष असलेल्या बालकावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली.

अमरावती जिल्ह्यातील आष्टी येथील रहिवासी असलेल्या या बालकाच्या कुटुंबीयांना समाज माध्यमांद्वारे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया केली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर त्यांनी बालकाला रुग्णालयात आणून रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी व ईएनटी सर्जन डॉ.मंगेश मेंढे यांची भेट घेतली.

आवश्यक वैद्यकीय तपासण्या केल्यानंतर बालकावर कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. अमरावती जिल्हा नियोजन समिती आणि प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ही शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली.

या शत्रक्रियेनंतर त्या बालकाला नव्या ऐकू येणाऱ्या जगाची दारे खुली झाले आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सातवी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने शासकीय आरोग्यसेवेतून आधुनिक आणि विशेष वैद्यकीय उपचार सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.

सदर शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील कान-नाक-घसा (ईएनटी) विभागाचे प्रमुख डॉ.जीवन वेदी आणि विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे ईएनटी सर्जन डॉ.मंगेश मेंढे यांनी ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली.

सदर शस्त्रक्रियेमधे भूलतज्ञ डॉ.चेतन रोंघे, डॉ.बाळकृष्ण बागवाले, डॉ.अश्विनी मढावी, ऑडियोलॉजिस्ट लक्ष्मण मोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ.उज्वला मोहोड, समाजसेवा अधीक्षक शीतल बोंडे, ऋषिकेश धस, महात्मा फुले जन आरोग्य योजनेमधील डॉ.पायल रोकडे, डॉ.दिव्यांनी मुंदाने, रजत हूमने, फार्मासिस्ट योगेश वाडेकर, बायोमेडिकल इंजीनियर शुभम बैरागडे, अधिसेविका चंदा खोडके, मालती प्रधान, इंचार्ज सिस्टर अलका मोहोड, सुनिती हरणे, वैशाली नगराळे, दीपिका वाठोडकर, कल्याण नगराळे, राहुल वायझाडे, शुभम गवई, अभिषेक निचत, यश गवई, यश घुगल, पुष्पा तायडे, लक्ष्मी सरडे, शुभांगी टिंगणे, प्रतीक्षा भगत, मनीषा कामेकर, प्रतीक्षा राऊत, दीक्षा गवई, जोत्स्ना कांबळे, स्वाती घवळे, शीतल सानप, सुचित्रा खराते, जोत्स्ना खोब्रागडे, आदिती टके, स्नेहा राठोड, ममता इरटकर, तेजस्विनी पवार, आकाश मनोहरे, राणी इंगळे, संगम उमरे, ज्ञानेश टांगेवर, सागर, गणोरकर, राहुल कवनपुरे, शाकिब मोहम्मद, नंदलाल राठोड यांचे शस्त्रक्रियेत मोलाचे सहकार्य होते.

संपादकीय

मोठेपणा हा वयाने नाही, तर विचारांनी आणि कर्तृत्वाने सिद्ध होतो.

तरुणांच्या हाताला काम कधी?

बेरोजगारीच्या विळख्यात अडकलेली तरुणाई; आश्वासनांपलीकडे रोजगाराची ठोस हमी कधी? भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेल्या देशांपैकी एक देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या विकासाचा कणा म्हणून तरुणाईकडे पाहिले जाते. देशाचे भविष्य तरुणांच्या हातात आहे, असे अभिमानाने सांगितले जाते. मात्र, याच तरुणांच्या हाताला काम मिळत नसेल, त्यांच्या शिक्षणाला योग्य संधी मिळत नसेल आणि रोजगाराच्या शोधात त्यांना वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागत असेल, तर या विकासाच्या दाव्यांचा नेमका अर्थ काय, असा प्रश्न उपस्थित होतो. आज देशातील बेरोजगारी हा केवळ आर्थिक प्रश्न राहिलेला नसून तो सामाजिक, शैक्षणिक आणि मानसिक चिंतेचा विषय बनला आहे. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या तरुणांच्या डोळ्यांत असंख्य स्वप्ने असतात. चांगली नोकरी मिळवावी, कुटुंबाला आर्थिक आधार द्यावा, स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि समाजात सन्मानाने जगावे, अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती वेगळीच दिसते. पदवी, पदव्युत्तर पदवी, अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करूनही अनेक तरुण रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत. शिक्षणासाठी कुटुंबाने केलेला खर्च, घेतलेले कर्ज आणि वर्षानुवर्षे केलेली मेहनत यानंतरही नोकरी मिळत नसेल, तर तरुणांच्या मनात निराशा निर्माण होणे स्वाभाविक आहे. विशेषतः शासकीय नोकरीचे आकर्षण आजही तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. पोलीस भरती, तलाठी भरती, ग्रामसेवक, शिक्षक भरती, आरोग्य विभाग, महसूल विभाग आणि इतर विविध सरकारी पदांसाठी लाखो उमेदवार तयारी करतात. मात्र, भरती प्रक्रियेतील विलंब, रिक्त पदांची अपुरी जाहिरात, परीक्षांच्या तारखांमधील अनिश्चितता, निकालास होणारा उशीर आणि कधी कधी निर्माण होणारे गैरप्रकार यामुळे उमेदवारांचा संयम सुटत आहे. अनेक तरुण वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करतात; परंतु भरतीच वेळेवर होत नसेल, तर त्यांच्या मेहनतीचे काय? शासकीय नोकरीच्या मर्यादित जागांसाठी लाखो उमेदवारांमध्ये स्पर्धा असते. त्यामुळे प्रत्येक तरुणाला सरकारी नोकरी मिळणे शक्य नाही, हे वास्तव स्वीकारावेच लागेल. परंतु खासगी क्षेत्रातही पुरेशा संधी निर्माण होत नसतील, तर शिक्षित तरुणांनी जायचे कुठे? अनेक ठिकाणी पदवीधर तरुणांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा कमी वेतनावर काम करावे लागते. काही ठिकाणी अनुभवाची अट असते; पण अनुभव मिळवण्यासाठी पहिली संधीच उपलब्ध होत नाही. ही रोजगार व्यवस्थेतील मोठी विसंगती आहे. दुसरीकडे, ग्रामीण भागातील बेरोजगारीचा प्रश्न अधिक गंभीर आहे. शहरांच्या तुलनेत ग्रामीण भागात उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत.

‘जर मावळत्या काळात अंधारच असेल, तर वंशाचे दिवे हवेत कशाला’

आजही आपल्या समाजात एक चित्र हमखास दिसते. मुलगा झाला की पेढे वाटले जातात, बँड वाजतो, आनंदाला उधाण येते. आणि मुलगी झाली की... एक विचित्र शांतता पसरते. काहीजण तर नाक मुरडतात. ‘पहिली मुलगी आहे, ठीक आहे... पण पुढच्यावेळी मुलगाच हवा.‘

हा विचारच मुळात आपल्या मावळत्या काळाचा आहे. वंशाचा दिवा म्हणजे फक्त मुलगा, ही संकल्पना अंधाराकडेच नेणारी आहे.

खरं तर विचार करा, दिवा कशासाठी लावतात? अंधार दूर करण्यासाठी. घर प्रकाशमान करण्यासाठी. मग जर तो दिवाच विझलेला असेल, त्याच्यात तेलच नसेल, वातच पेटत नसेल, तर त्या दिव्याचा उपयोग काय?

आज कितीतरी ’वंशाचे दिवे’ आपण पाहतो, जे आई–वडिलांना वृद्धाश्रमाची वाट दाखवतात. संपत्तीसाठी आई–वडिलांना कोर्टात खेचतात. व्यसनाच्या आहारी जाऊन घराचे वाटोळे करतात. मग अशा दिव्यांनी

घर उजळणार आहे की अंधारात जाणार आहे?

आणि दुसरीकडे मुलगी आहे. जिचा जन्म नकोसा वाटला, तिच मुलगी आज काय करत आहे? ती मुलगी कल्पना चावला होऊन अंतराळात जाते. ती पी.टी. उषा होऊन देशासाठी धावते. ती किरण बेदी होऊन पोलिसांची वर्दी घालते. ती सिंधुताई सपकाळ होऊन हजारो अनाथांची माय होते. ती आज सीमेवर बंदूक घेऊन देशाचे रक्षण करते, ती विमान चालवते, ती जिल्हाधिकारी होते, ती पंतप्रधान होते.

ती पुरुषाची सर्व कामे तर करतेच, पण जी कामे पुरुष कधीच करू शकत नाही, ती सुद्धा करते. ती नऊ महिने पोटात बाळ वाढवते, ती घर सांभाळते, ती दोन कुटुंबांना जोडते. माहेर आणि सासर दोन्ही घरांचा दिवा तीच प्रज्वलित ठेवते.

आज वृद्ध आई–वडिलांची सेवा कोण करतंय? आकडेवारी काढली तर लक्षात येईल, मुलापेक्षा मुलगीच जास्त आपल्या आई–वडिलांची काळजी घेते. मुलगा लग्नानंतर बायकोच्या आणि नोकरीच्या संसारात गुंततो, पण मुलगी लग्नानंतरही रोज फोन करून ‘बाबा, औषध घेतलं का? आई, जेवलीस का?‘ विचारणारी ही मुलगीच असते.

मग आम्ही वंशाचा दिवा कोणाला म्हणायचं? जो फक्त आडनाव पुढे नेतो त्याला, की जो संस्कार पुढे नेतो त्याला? खरं तर वंश हा आडनावाने नाही, तर संस्काराने चालतो. रक्ताने नाही, तर विचाराने चालतो. ज्या घरात मुलीला शिकवलं जातं, त्या घरात दोन पिढ्या शिकतात. कारण ती मुलगी उद्या एका घराची आई होणार असते. एक सुशिक्षित आई शंभर शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ असते.

आज गरज आहे ती विचार बदलण्याची. गर्भात मुलगी आहे म्हणून तिला मारून टाकणं, हा दिवा विझवण्याचा प्रकार नाही तर सूर्यच विझवण्याचा प्रकार आहे. म्हणून माझं स्पष्ट मत आहे – मुलगा वंशाचा दिवा असेलही, पण मुलगी ही वंशाची मशाल आहे. दिवा एका घरापुरता प्रकाश देतो, पण मशाल दोन घरांना आणि संपूर्ण समाजाला प्रकाश देते.

ज्या दिवशी समाजाला हे कळेल की मुलगी म्हणजे ओझं नाही, तर तीच खरी ताकद आहे, त्या दिवशी खऱ्या अर्थाने आपला मावळता काळ संपेल आणि उजळती पहाट सुरू होईल.

आणि जर मावळत्या काळात अंधारच असेल, तर फक्त नावापुरते दिवे नकोत, तर खऱ्या अर्थाने उजेड देणारे दिवे हवेत... आणि ते दिवे म्हणजे आमच्या मुलीच आहेत.

शेषराव नर्मदा गोपाळ कडू
मो.नं.९९२३९८८७३४
वरुड जी. अमरावती

अध्यात्म शक्तीला राष्ट्र निर्मितीशी जोडणारे संत

भारतीय संतपरंपरेने अध्यात्मासोबतच समाजप्रबोधन, समता आणि मानवतेची मूल्ये जपली आहेत.या परंपरेला आधुनिक राष्ट्रनिर्मितीची दिशा देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे विसाव्या शतकातील एक लोकोत्तर व्यक्तिमत्त्व होते. स्वातंत्र्य मिळिवणे हे राष्ट्रनिर्मितीचे अंतिम उद्दिष्ट नसून, स्वतंत्र भारताला समताधिष्ठित, स्वावलंबी, एकात्म आणि समृद्ध बनविणे ही खरी जबाबदारी आहे, याची जाणीव त्यांनी समाजाला करून दिली. म्हणूनच त्यांचे कार्य केवळ संतपरंपरेपुरते मर्यादित न राहता नवभारताच्या उभारणीशी जोडले गेले.

आज त्यांच्या पुण्यतिथीला त्यांना अभिवादन करताना त्यांनी निर्माण केलेल्या आदर्शावर समाजाने आणि समाजातील संत समुदायाने वाटचाल करणे आवश्यक वाटते.या भारताच्या नवनिर्माणासाठी कोणत्याही काळामध्ये या ठिकाणच्या सज्जनशक्तीने एकत्रित येणे आवश्यक वाटते.

स्वातंत्र्यानंतर संघटन करण्याचा ध्यास

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर सामाजिक विषमता,धर्माधर्मातील असंतोष, निरक्षरता, ग्रामीण दारिद्र्य, जातिभेद आणि राष्ट्रीय एकात्मतेची आव्हाने होती. या परिस्थितीत समाजाच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या संतांनी राष्ट्रनिर्मितीच्या कामात सक्रिय सहभाग घ्यावा, अशी भूमिकातत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी मांडली. या भूमिकेला राष्ट्रव्यापी करण्याचे ध्येय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी घेतले. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याशी संबंधित चरित्रपर संदर्भातूनही राष्ट्रसंतांच्या कार्याला मिळालेल्या राष्ट्रीय मान्यतेचे महत्त्व स्पष्ट होते. राष्ट्रपती भवनातील त्यांच्या खंजिरी भजनाने आणि राष्ट्रभक्तिपर विचारांनी त्यांचे कार्य राष्ट्रीय स्तरावर पोहोचले.

संतांचा प्रभाव केवळ धार्मिक श्रद्धेपुरता न राहता तो लोकशिक्षण, सामाजिक परिवर्तन आणि देशसेवेसाठी उपयोगात यावा, हा त्यांच्या कार्याचा गाभा होता. देशभरातील संतांना व्यापक राष्ट्रहिताच्या कार्यासाठी एकत्र आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना १९५६ मध्ये महत्त्वाचे वळण मिळाले. दिल्ली येथे विविध आखाड्यांतील,राज्यातील,धर्मपिठातील धर्माचार्य आणि संतांच्या सहभागातून भारत साधू समाजाची स्थापना झाली.

गुरुकुंज आश्रमाच्या जीवनदर्शनविषयक नोंदीनुसार, या संस्थेच्या स्थापनेत राष्ट्रसंतांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि त्यांची प्रथम अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. संतशक्तीला संघटित सामाजिक कार्याची दिशा देणारा हा प्रयत्न त्यांच्या राष्ट्रनिर्माणविषयक दृष्टिकोनाचा महत्त्वाचा आविष्कार होता. संत कसा असावा. भारताच्या नवनिर्माणात संतांची भूमिका कशी सर्वसमावेशक असावी, याचा वस्तुपाठ राष्ट्रसंतानी आपल्या साहित्यातून घालून दिला आहे.

स्वातंत्र्यलढ्यातून राष्ट्रभक्तीची प्रेरणा

राष्ट्रसंतांचे राष्ट्रकार्य स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरू झाले नव्हते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी भजन आणि कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या काळात त्यांच्या राष्ट्रभक्तिपर रचनांनी जनमानसात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली. चिमूर, आष्टी,यावली या भागात राष्ट्रसंतांच्या शब्दांनी राष्ट्रभक्तीच्या स्फुल्लिंग चेतविले. आते है नाथ हमारे या भजनातील ’झाडझडुले शस्त्र बनेगी! भक्त बनेगी सेना, पत्थर सारे बॉम्ब बनेगी, नाव लगेगी किनारे ’ यांसारख्या स्फूर्तिगीतांनी ग्रामीण भागातील जनतेला आंदोलनाशी जोडण्याचे काम केले. ब्रिटिश सत्तेने त्यांना अटक केली आणि तुरुंगवासही भोगावा लागला.

त्यांनी लोकभाषेचा, लोकसंगीताचा आणि त्यांचा गावागावातील जनसंपर्काच्या प्रभावी माध्यमांचा उपयोग राष्ट्रीय जाणीव जागविण्यासाठी केला. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्तता नव्हे; तर समाजातील अन्याय, अज्ञान आणि विषमतेतूनही मुक्तता होती.

ग्रामविकासातून राष्ट्रविकासाचा मार्ग

भारत हा खेड्यांचा देश आहे आणि खेड्यांची प्रगती झाल्याशिवाय देशाची सर्वांगीण प्रगती शक्य नाही, ही राष्ट्रसंतांची ठाम धारणा होती. याच विचारातून त्यांनी ग्रामगीता हा ग्रंथ लिहिला. ग्रामस्वच्छता, शिक्षण, श्रमप्रतिष्ठा, सहकार, व्यसनमुक्ती, नैतिकता, स्वावलंबन आणि लोकसहभाग या घटकांचा समन्वय साधणारा हा ग्रामविकासाचा विचार आहे.

गाव हा विश्वाचा नकाशा, गावावरून देशाची परीक्षा ही त्यांच्या विचारांची दिशा स्पष्ट करणारी ओळ आहे. ग्रामविकास हा केवळ रस्ते, पाणी आणि इमारतींच्या निर्मितीपुरता मर्यादित नसून गावातील माणसांच्या विचारांत, आचरणात आणि परस्पर संबंधांत परिवर्तन घडविण्याची प्रक्रिया आहे, असे त्यांच्या कार्यातून दिसते.

१९३५ मध्ये स्थापन केलेल्या गुरुकुंज आश्रमाच्या माध्यमातून त्यांनी समाजसेवा, सामुदायिक प्रार्थना आणि विधायक उपक्रमांना चालना दिली. अखिल भारतीय श्री. गुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून ग्रामोन्नतीचा विचार व्यापक जनसमुदायापर्यंत पोहोचविला. गावकऱ्यांनी स्वतःच्या विकासाची जबाबदारी स्वीकारावी आणि श्रमदानातून सामूहिक प्रगती साधावी, हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा संदेश होता.

संकटकाळातील राष्ट्रसेवा आणि राष्ट्रीय एकात्मता

राष्ट्रनिर्मिती म्हणजे केवळ विकासाच्या योजना नव्हेत, तर संकटाच्या वेळी देशबांधवांच्या मदतीला धावून जाणेही होय. बंगालच्या दुष्काळाच्या काळात, १९६२ मधील चीनच्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर, कोयना भूकंपानंतर आणि १९६५ मधील पाकिस्तानच्या आक्रमणाच्या काळात राष्ट्रसंतांनी मदतकार्य व जनजागृतीच्या माध्यमातून राष्ट्रसेवेचा आदर्श घालून दिला. त्यांचे कार्य अध्यात्म आणि कृती यांच्यातील अंतर मिटविणारे होते.अध्यात्मिक गुरूंनी,संतांनी,अध्यात्मिक प्रबोधनकारांनी समाज जागृती करताना देशाला अन्य कोणत्याही बाबीपेक्षा महत्त्व देणे आणि बंधुता जपणे आवश्यक असल्याचे सांगून जाते.

विश्वशांती परिषदेत बंधूभावाचा प्रचार

१९५५ मध्ये जपानमध्ये आयोजित जागतिक धर्मपरिषद आणि विश्वशांतीविषयक परिषदांमध्ये सहभाग घेऊन त्यांनी मानवता आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देशाबाहेरही पोहोचविला. राष्ट्रनिर्मितीचा त्यांचा विचार भारताच्या सीमांपुरता मर्यादित नव्हता; तो विश्वशांतीच्या व्यापक मूल्यांशी जोडलेला होता.संत ज्ञानेश्वराच्या बंधू भावाच्या पसायदानाला त्यांनी आपल्या खंजिरीची साथ दिली.जापान मध्येही त्यांनी विश्वबंधुत्वाचा नारा देत जगातील सतप्रवृत्तींना एकत्रित आणण्याचे जागतिक कार्य केले.

नवभारतासाठी आजही मार्गदर्शक विचार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनातून जनजागृती केली, संघटनातून समाजसेवेची शक्ती उभी केली आणि ग्रामगीतेतून ग्रामविकासाचा विचार मांडला. संतशक्तीला विधायक राष्ट्रकार्यात सहभागी करून घेणे, सामान्य माणसाला विकासाचा सक्रिय भागीदार बनविणे आणि सामाजिक एकात्मतेतून राष्ट्राची उभारणी करणे, ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये होती.

आज विकसित भारताच्या संकल्पनेत ग्रामविकास, नागरिकांचा सहभाग, सामाजिक एकात्मता आणि स्वावलंबन यांना महत्त्व आहे. या सर्व मूल्यांचा आग्रह राष्ट्रसंतांनी आपल्या कार्यातून अनेक दशकांपूर्वी धरला होता. त्यांच्या पुण्यतिथीला त्यांचे स्मरण करताना त्यांच्या विचारांना केवळ गौरवोद्गारांपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष कृतीत आणणे आवश्यक आहे.

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या...

अशी जगण्याची माफक अपेक्षा ठेवणारे आणि सामान्यातील सामान्य माणसाच्या आयुष्यातील समाधानांना शोधणारे तुकडोजी महाराज यांचे साहित्य त्यांच्या वैचारिक वारशाला अधोरेखित करते.बंधुभावाने जोडलेला समाज, स्वावलंबी खेडी आणि सेवाभावी नागरिक यांच्या बळावरच नवभारताची भक्कम पायाभरणी होऊ शकते, हा त्यांच्या जीवनकार्याचा आजही प्रेरणा देणारा संदेश आहे.आध्यात्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या विविध जातीपंथातील संत परंपरेने देखील खरे राष्ट्र निर्माण काय असते.यासाठी राष्ट्रसंतांनी निर्माण केलेले साहित्य राष्ट्रसंतांनी समाजाला दिलेले विचार आणि सामाजिक बंधुता आजही सर्वांना प्रेरणादायी आहे.आज त्यांच्या पुण्यतिथीला त्यांना विनम्र अभिवादन.

प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर
९७०२८५८७७७

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

‘शिवसेनेच्या सदस्यांना वेठबिगार समजाल तर सहा महिन्यात सत्ता उलटून टाकू’ तानाजी सावंतांचा राणा पाटील यांना इशारा : धाराशिवमध्ये महायुतीत खदखद

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

धाराशिव – जिल्हा परिषदेमधील सत्तेचा माज आम्ही खपवून घेणार नाही, शिवसेनेच्या सदस्यांना वेठबिगार समजाल तर सहा महिन्यात सत्ता उलटून टाकू असा इशारा शिवसेनेचे आमदार तानाजी सावंत यांनी भारतीय जनता पार्टीचे आमदार राणाजगजितसिंह पाटील व अर्चना पाटील यांना दिला आहे. तानाजी सावंत यांच्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा धाराशिव जिल्ह्यात महायुतीमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा उघड झाले आहेत.

जिल्हा परिषदेमधील सत्तेच्या मुद्द्यावरून शिवसेना आणि भाजपमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे. जिल्हा परिषदेत सुरु असलेल्या मनमानी सत्तेवर शिंदेसेनेचे आमदार तानाजी सावंत यांनी भारतीय जनता पार्टीचे सत्ताधारी आमदार राणाजगजितसिंह पाटील व अर्चना पाटील यांना दिला आहे. जिल्हा परिषद सदस्यांना ते म्हणाले,‘ कुठलीही गोष्ट लादून घ्यायची नाही. आपण वेठबिगार नाही. आपल्या जीवावर सत्ता आलेली आहे. सत्ता तुमची नाही, सत्ता आमचीही आहे. मनमानी व हुकुमशाही पद्धतीने सत्ता चालवू नका, वेठबिगार आणि गुलाम समजून काम सांगितलं, तर काम करू नका, निषेध नोंदवा. तानाजी सावंत यांचा शिवसेनेच्या जिल्हा परिषद सदस्यांना आदेश दिले आहेत.सत्तेचा माज आम्ही खपवून घेणार नाही, शिवसेनेच्या सदस्यांना वेटबिगार समजलं तर सहा महिन्यात सत्ता उलटून टाकू असा इशाराही त्यांनी दिला. पदवीधर निवडणुकीत सुरू झालेला सत्ताधारी भाजप व शिवसेनेतील वाद आता धाराशिवच्या जिल्हा परिषदेत येऊन पोहोचला असून आता सत्ताधारी भाजप शिवसेनेत तानाजी सावंत यांच्या या वक्तव्याने नव्या वादाची चिन्ह निर्माण झाले आहेत. ’आमच्या जीवावर सत्तेत आहात. सत्ता आमचीही आहे. जिल्हा परिषदेचे सदस्य ठरवतील. सिईओ त्यांना मार्गदर्शन करेल. अन्याय सहन करायचा नाही.आपण चांगल्या पद्धतीने काम करायचं. दुष्काळाला चांगल्या पद्धतीने सामोरं जायचं’ असे आमदार तानाजी सावंत म्हणाले. दरम्यान, परंडा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना कर्जाच्या वसुलीसाठी त्रास दिल्यास शिवसेना स्टाईलने उत्तर दिले जाईल, असा इशाराही आमदार तानाजी सावंत यांनी दिलाय.

आरटीओंना नोटीस : एचएसआरपी बसविण्यात दिरंगाई भोवणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

मुंबई – वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसविण्यात दिरंगाई होत असल्याने राज्याचे परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी राज्यातील २७ प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या (आरटीओ) प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या ५० टक्क्यांहून अधिक वाहनांना अद्याप एचएसआरपी बसवल्या नाहीत, याकडे नोटिसांमधून लक्ष वेधले आहे.

नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांत उत्तर सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. निर्धारित मुदतीत स्पष्टीकरण न मिळाल्यास किंवा ते असमाधानकारक आढळले, तर नियमानुसार पुढील कारवाई प्रस्तावित केली जाईल. परिवहन आयुक्तांनी जुलैपासून आतापर्यंत एचएसआरपी बसविण्याच्या कामाचा तीन वेळा आढावा घेतला आहे.

जैन कलार समाजाच्या कोजागिरी उत्सवात स्त्रीशक्तीचा गौरव!

समाजातील सर्व महिलांचा मंचावर सन्मान : ऑर्केस्ट्रा, लावणी आणि स्नेहभोजनाने उत्सवाची रंगत वाढवली

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

लाखनी – सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सांस्कृतिक परंपरेचा सुंदर संगम घडविणारा जैन कलार समाजाचा कोजागिरी उत्सव लाखनी येथे उत्साहात संपन्न झाला.

मध्यवर्ती मंडळ नागपूर संचालित येथील जैन कलार समाज भवनात आयोजित या उत्सवाला समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. विशेष म्हणजे, समाजातील सर्व महिलांना एकाच व्यासपीठावर स्थान देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव आणि त्यांना सन्मानाने व्यक्त होण्यासाठी मिळवून दिलेले व्यासपीठ हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सोनाली भांडारकर होत्या. समाजाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान अनमोल असते. कुटुंबाच्या उभारणीपासून समाजाच्या प्रगतीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर महिला महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या योगदानाची दखल घेत समाजातील सर्व महिलांना मंचावर विराजमान करून त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. महिलांना सन्मानाचे स्थान देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला. केवळ महिलांचा गौरव करण्यापुरतेच नव्हे, तर समाजजीवनात त्यांचे स्थान अधिक अधोरेखित करण्याच्या दृष्टीनेही या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने समाजाच्या सामाजिक कार्यासाठी हातभार लावणाऱ्या दानशूर व्यक्तींचाही यथोचित सत्कार करण्यात आला. समाजहितासाठी पुढाकार घेणाऱ्या या व्यक्तींच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेऊन खरेदी केलेल्या शीतपेटीचे लोकार्पण करण्यात आले. सामाजिक कार्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

कोजागिरीच्या निमित्ताने आयोजित स्नेहभोजनाचाही समाजबांधवांनी भरभरून आस्वाद घेतला. एकत्रित भोजनातून आपुलकीचे बंध अधिक दृढ झाले, तर संवाद आणि सहवासातून सामाजिक एकात्मतेची भावना अधिक बळकट झाली. महिलांचा सन्मान, दानशूरांच्या योगदानाचा गौरव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी, अशा विविध पैलूंनी सजलेला हा कोजागिरी उत्सव समाजाच्या एकजुटीचे प्रतीक ठरला. परंपरेला आधुनिक सामाजिक जाणिवांची जोड देत महिलांना सन्मानाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम समाजाच्या सकारात्मक वाटचालीची जाणीव करून देणारा ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजक चंदन रणदिवे, कृष्णा खेडीकर, रूपचंद भांडारकर, रवींद्र शेंडे, मधू खेडीकर, हरिहर ठवरे, रमेश पालांदूरकर, शिल्पा रणदिवे, भूमिता तिडके, छाया भदाडे, राणी लिचडे आदींनी पुढाकार घेतला.

कंत्राटदारांचे आजपासून ‘फोन करो’ आंदोलन

थकीत ८६ हजार कोटी देण्याची मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

मुंबई – राज्य सरकारच्या विविध विभागांतील विकासकामे मार्गी लावल्यानंतर थकीत देयकांची रक्कम मिळवण्यासाठी कंत्राटदारांना मंत्रालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागत आहेत.

तरीही राज्य सरकारकडून थकीत देयकांची ८६ हजार कोटींची रक्कम देण्याबाबत चालढकल केली जाते. ही रक्कम मिळत नसल्याने गेल्या वर्षभरात जवळपास ९ ते १० कंत्राटदारांनी आत्महत्या केली आहे. तरीही राज्य सरकार कोणतीही दखल घेत नसल्याने अखेर शुक्रवार, ३० ऑक्टोबरपासून मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना फोन करून देयकाची रक्कम देण्यासाठी साकडे घालण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली. विविध शासकीय विभागांमधील विकासकामे पूर्ण करून, कामांची मोजमापे घेऊन आणि बिले सादर करूनही देयके मिळत नसल्याने राज्यातील कंत्राटदारांमध्ये नाराजी वाढली आहे. थकीत देयकांची रक्कम मिळावी यासाठी अनेकदा आंदोलने केली. मात्र राज्य सरकारकडून फक्त आश्वासनांवर बोळवण करण्यात आली. अखेर मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्यात येणार आहे. त्यासाठी ०२२-२२०२५५४० आणि ०२२-२२०२५२२२ हे दूरध्वनी क्रमांक देण्यात आले आहेत. शुक्रवारी मुख्यमंत्री कार्यालयात संपर्क साधण्यात येणार आहे.

कामे पूर्ण, मग देयके कधी!

‘काम पूर्ण झाले, मोजमाप झाले, बिले सादर झाली आणि सर्व प्रक्रिया पूर्ण झाली, मग देयके कधी मिळणार?’ असा सवाल या आंदोलनाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात येत आहे.

या विभागांकडून देयकांची रक्कम येणे

सार्वजनिक बांधकाम विभाग २७ हजार कोटी, जलजीवन मिशन ३८ हजार कोटी, ग्रामविकास विभाग ३५०० कोटी, आदिवासी विभाग १२ हजार कोटी , पर्यटन विभाग २५०९ कोटी, जलसंपदा, जलसंधारण, नगरविकाससह इतर अनेक विभागाकडील देयके प्रलंबित आहेत.

पुढील ७ वर्षांत इतिहास घडवून दाखवीन! नवनिर्वाचित आमदार कौस्तुभ गावडेंचा निर्धार

भव्य मिरवणुकीसह मान्यवरांकडून सत्कार

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

कोल्हापूर – पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत ३० उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी २९ उमेदवार मला पराभूत करण्यासाठी प्रयत्न करत होते, तर मी केवळ विजयी होण्यासाठी लढत होतो. इतिहास घडला नसून, पुढील सहा वर्षांत इतिहास घडवून दाखवीन, असा ठाम निर्धार पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार कौस्तुभ मुरलीधर गावडे यांनी व्यक्त केला. त्यांच्या विजयाच्या निमित्ताने आयोजित विजयी मेळावा हजारो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संस्थाचालक आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

त्यानंतर कावळा नाका, दसरा चौक ते श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीस्थळापर्यंत भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली. घोषणांच्या गजरात शिक्षक आणि कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा केला.

या वेळी आमदार अशोकराव माने (बापू), श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कोजिमाशिचे तज्ज्ञ संचालक दादासाहेब लाड, टीडीएफचे काटकर सर, विद्यासमितीचे अध्यक्ष डॉ.श्रीराम साळुंखे, प्रभारी प्राचार्य डॉ.महेश गायकवाड, प्राचार्या डॉ.शैलजा साळुंखे, प्राचार्या डॉ.श्रुती जोशी, कृती समितीचे बाबा पाटील व दत्ता पाटील, प्रसिद्ध वक्ते प्रा. मधुकर पाटील, प्रा.गीतांजली साळुंखे आणि आमदार गावडे यांच्या पत्नी मयुरी गावडे यांनी मनोगते व्यक्त केली. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आमदार गावडे यांचा सत्कार करून अभिनंदन केले. शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे हक्क आणि शिक्षण क्षेत्रातील समस्यांवर विधान परिषदेत प्रभावीपणे आवाज उठवावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. या मेळाव्यास मुरलीधर गावडे, आजीव सेवक अजित देसाई, प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे, अनिल कामत, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी आणि पाच जिल्ह्यांतून आलेले शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांच्या विश्वासाला कृतीतून उत्तर देण्याचा निर्धार व्यक्त करत आमदार कौस्तुभ गावडे यांच्या पुढील कार्यकाळाकडे आता शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

४० तास झोपलो नाही मेळाव्यात मनोगत व्यक्त करताना आमदार गावडे म्हणाले, एका आजी आणि एका माजी आमदाराला पराभूत करून मी विजयी झालो आहे. हा विजय शिक्षकांनी दाखवलेल्या विश्वासाचा आहे. शिक्षकांच्या प्रश्नांना निश्चितपणे न्याय मिळवून देईन. मतमोजणीच्या प्रदीर्घ प्रक्रियेचा उल्लेख करत ते म्हणाले, मतमोजणीदरम्यान मी ४० तास झोपलो नव्हतो; मात्र आता पुढील सहा वर्षे न झोपता काम करून दाखवीन. शिक्षकांच्या प्रश्नांवर ठोस काम करून इतिहास घडविण्याचा माझा निर्धार आहे.

वनसंपदेसाठी न्यायालयात दाद मागू : काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा इशारा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

कर्जत/मुंबई – भ्रष्टाचाराची मलई खाण्याच्या नादात गुजरातच्या कंपनीला ‘सह्याद्री’ विकला आहे.

सह्याद्रीचा वारसा विकण्याचा भाजप-महायुती सरकारचा प्रयत्न महाराष्ट्राची जनता कदापी सहन करणार नाही. भाजप सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सर्व मनसुबे हाणून पाडू, वेळप्रसंगी कर्जत-भीमाशंकरच्या वनसंपदेचे रक्षण करण्यासाठी न्यायालयात धाव घेऊ, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

टोरंट कंपनीसाठी कर्जत- भीमाशंकरच्या जंगलात होत असलेल्या झाडांच्या कत्तलीची पाहणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली व स्थानिक गावकऱ्यांशी संवाद साधला. सपकाळ म्हणाले की, टोरंट कंपनीसाठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली जात आहे.

भाजप सरकार भ्रष्टाचारात आकंठ बुडाले असून महाराष्ट्र विकायला काढला आहेच, पण आता कमिशनसाठी निसर्गही विकायला काढला आहे. कर्जत-भीमाशंकरच्या जंगलात होत असलेला हा प्रकल्प महाराष्ट्राच्या हिताचा नाही. या प्रकल्पातून हजारो रोजगार निर्माण होतील, या वृक्षतोडीच्या बदल्यात दुसरीकडे लाखो झाडे लावू या केवळ पोकळ घोषणा आहेत. याआधी याच सरकारने ३३ कोटी झाडे लावण्याचा संकल्प केला होता त्याचे काय झाले.

यातील एकही झाड कोणी पाहिले नाही. हा प्रकल्प अत्याधुनिक असल्याचे सरकार सांगत आहे. मग हजारो रोजगार कुठून येणार. मुळात भाजप सरकार व मुख्यमंत्री फडणवीस यांच्या बोलण्यावर कोणाचाही विश्वास नाही.

ते महाराष्ट्राची दिशाभूल करत असून फेक नरेटिव्ह पसरवत आहेत, असा इशारा त्यांनी दिला.

माजी सैनिक देवानंद मेश्राम यांना आठव्यांदा सुपर रांडोनियरचा खिताब

१ लाख किलोमीटर सायकलिंगचा पुर्ण केल्याचे बनले मानकरी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

वरूड – जिद्द, चिकाटी, शिस्त आणि सातत्य यांच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, याचा प्रत्यय मंडळ अधिकारी तथा माजी सैनिक देवानंद मेश्राम यांनी दिला आहे. अवघ्या एक किलोमीटर सायकलिंगपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आता तब्बल १ लाख किलोमीटर सायकलिंगचा टप्पा पूर्ण करण्यापर्यंत पोहोचला आहे. विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग मोहिमा, अल्ट्रा सायकलिंग स्पर्धा आणि सामाजिक उपक्रमांमधील त्यांचे योगदान अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विमानांमुळे हजारो किलोमीटरचा प्रवास काही तासांत शक्य झाला आहे, तर वेगवान वाहनांमुळे रस्ते प्रवासही अधिक सुलभ झाला आहे. मात्र, या वेगवान जीवनशैलीत सायकलचे महत्त्व

आजही कायम आहे. सायकलिंग हा केवळ प्रवासाचा पर्याय नसून शारीरिक तंदुरुस्ती, पर्यावरण संवर्धन आणि इंधन बचतीचा प्रभावी मार्ग आहे. नियमित सायकलिंगमुळे सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन मिळते आणि आरोग्याबाबत जागरुकताही वाढते.

याच विचारातून तत्कालीन तहसीलदार तथा सध्याचे उपजिल्हाधिकारी आशीष बिजवल यांनी वरुड येथे सायकलिंग उपक्रमाची सुरुवात केली. या उपक्रमातून प्रेरणा घेत देवानंद मेश्राम यांनी अवघ्या एक किलोमीटरपासून सायकलिंगला सुरुवात केली. सुरुवातीला एक लाख किलोमीटरचा टप्पा पूर्ण होईल, अशी कल्पनाही त्यांनी केली नव्हती. मात्र, सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम आणि कुटुंबाच्या भक्कम पाठिंब्यामुळे त्यांनी हे ध्येय गाठले. या प्रदीर्घ प्रवासासाठी त्यांच्या कुटूंबाने तब्बल ५ हजार ३०० तास, म्हणजेच सुमारे २२१ दिवस त्यांना साथ देत त्याग केला.

काश्मीर ते कन्याकुमारी : ३,६२६ किलोमीटरचा थरारक प्रवास

देवानंद मेश्राम यांच्या सायकलिंग कारकिर्दीतील विशेष उल्लेखनीय कामगिरी म्हणजे काश्मीर ते कन्याकुमारी हे ३,६२६ किलोमीटरचे अंतर अवघ्या ११ दिवस, २२ तास आणि १० मिनिटांत पूर्ण करणे. नागपूरचे डॉ.अमित समर्थ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ही कामगिरी केली. या प्रवासातून त्यांनी ५० ते ६० वयोगटात जागतिक विक्रम प्रस्थापित केले. याशिवाय त्यांनी अनेक कठीण आणि आव्हानात्मक सायकलिंग मोहिमांमध्ये सहभाग घेतला असून, विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य सिद्ध केले आहे.

`**पचमढी सिग्नेचर राइड :** नागपूर ते पचमढी आणि परत असा ६०० किलोमीटरचा प्रवास पूर्ण.

`**डेक्कन क्लिफहँगर अल्ट्रा सायकलिंग स्पर्धा :** पुणे ते गोवा हे अंतर ३३ तासांत पूर्ण.

`**१,००० किलोमीटर इठच :** नागपूर ते हैदराबाद आणि परत हा टप्पा दोन वेळा पूर्ण.

`**'क्लाइम्ब का बाप' १,२०० किलोमीटर ङठच :** दिल्ली येथे ही आव्हानात्मक सायकलिंग मोहीम ८७ तास २७ मिनिटांत पूर्ण.

`**'गेट्स ऑफ हेवन' १,२०० किलोमीटर ङठच :** बेंगळुरू येथील ही मोहीम निर्धारित वेळेपेक्षा ३० मिनिटे उशिरा पूर्ण.

`**सुपर रँडोन्युअरचा आठ वेळा मान :** २००, ३००, ४०० आणि ६०० किलोमीटरचे टप्पे पूर्ण करून आठ वेळा हा मान मिळवला. यात जिंतूर येथे पूर्ण केलेल्या पाच दिवसांच्या डठ मालिकेचाही समावेश आहे.

` **ग्रेट हिमालयन अल्ट्रा सायकलिंग स्पर्धा :** लेह-लडाख ते कारगिल आणि परत या आव्हानात्मक मार्गावरील स्पर्धेत विजेतेपद मिळवले.

या कामगिरीमधून त्यांनी वय हे ध्येयपूर्तीतील अडथळा नसून इच्छाशक्ती, शिस्त आणि सातत्य यांच्या जोरावर मोठी उद्दिष्टे साध्य करता येतात, हे दाखवून दिले आहे. देवानंद मेश्राम यांनी सायकलिंगच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करतानाच आपल्या शासकीय कार्यक्षेत्राबाहेर जाऊन सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

गावांच्या विकासासाठी आणि लोकसहभागातून सामाजिक परिवर्तन घडविण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय आहेत. लोणी येथे नियुक्तीवर असताना त्यांनी गावकऱ्यांना महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत पुरस्कार मिळिवण्यासाठी सहकार्य केले. त्यांच्या प्रयत्नांतून गावाला ७.५ लाख रुपयांचे बक्षीस मिळविण्यात मदत झाली.

वाठोडा येथे कार्यरत असताना अमीर खान यांच्या नेतृत्वाखालील 'सत्यमेव जयते वॉटर कप' जलसंधारण उपक्रमात गावकऱ्यांना सहभागी होण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. या उपक्रमांतर्गत गावकऱ्यांना २५ लाख रुपयांचे बक्षीस मिळिवण्यासाठी त्यांनी सहकार्य केले. तसेच वाठोडा आणि मुसलखेडा परिसरातील जलसंधारण उपक्रमांमध्येही त्यांनी योगदान दिले. या प्रयत्नांतून १० लाख रुपयांचे बक्षीस मिळिवण्यासाठी गावकऱ्यांना मदत झाल्याची माहिती आहे. याशिवाय विविध रक्तदान शिबिरे आणि वृक्षारोपण उपक्रमांमध्ये सहभागी होत त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे.

एक लाख किलोमीटर सायकलिंगचा हा प्रवास पूर्ण करताना मिळालेल्या यशाचे श्रेय देवानंद मेश्राम यांनी आपल्या कुटुंबीयांना, वरुड सायकलस्वार ग्रुपला, निवासी उपजिल्हाधीकारी संतोश काकडे, उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार, तहसीलदार रामदास शेळके, नायब तहसीलदार पंकज चौहान, नामदेव गडलिंग वरुड तालुक्यातील सर्व नागरिक आणि संपूर्ण महसुल परिवाराला दिले आहे.

सायकलिंगच्या माध्यमातून आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा संदेश देणारे देवानंद मेश्राम यांचे कार्य तरुणांसह सर्व वयोगटांतील नागरिकांसाठी प्रेरणादायी आहे. एक किलोमीटरपासून सुरू झालेला प्रवास एक लाख किलोमीटरपर्यंत पोहोचणे ही केवळ वैयक्तिक कामगिरी नसून जिद्द, सातत्य आणि कुटुंबाच्या पाठिंब्याची यशोगाथा आहे.

भाजपने ठरवून शिंदेसेनेची जिरवणे सुरू केलंय : विजय वडेट्टीवारांचा घणाघात

देवेंद्र फडणवीसांनी आपली व्यवस्था बरोबर केलीय, सरकार कोसळणार!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

नागपूर – भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत तसेच देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील संबंध ताणले आहे. त्यात एकमेकांना चेकमेट आहे. पूर्णेकर हत्या प्रकरणात जो काही वाद निर्माण झालेला आहे, त्याला भारतीय जनता पक्षाने हवा दिलेली आहे.

निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात उभे राहिले, एकमेकांशी संवाद संपला आहे. निधीच्या फायली अडवल्या जात आहे. निधी वाटपावरून गोंधळ निर्माण झाला आहे. आता भाजपने ठरवून शिंदे सेनेची जिरवणे सुरू केले आहे. अशी बोचरी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. दोन्ही पक्षांमध्ये प्रचंड धुसफूस आहे. तुम्ही नांदा,

भांडा, काहीही करा, पण तुमच्या भांडणाचे परिणाम महाराष्ट्राच्या विकासावर होऊ नयेत. सरकारमध्ये प्रचंड भ्रष्टाचार वाढलेला आहे. दोघांच्या भांडणात सामान्य माणसाचे हाल होत आहेत. खाली कोणाचेही काम होत नाही. नवरा-बायकोसारखे भांडण सुरू असल्याचा टोलाही विजय वडेट्टीवार यांनी लगावला आहे.

ते नागपुरात बोलत होते. दरम्यान, सरकारकडे बहुमत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आपली व्यवस्था बरोबर करून ठेवली आहे. मित्रपक्षातील नेतेसुद्धा त्यांच्या संपर्कात आहेत. मला असे वाटत नाही की, सरकार कोसळणार आहे. असा दावाही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

शेतकऱ्यांची बदनामी करणाऱ्या व्यक्तीला आमदार म्हणून राहण्याचा काहीही अधिकार नाहीसरकारला आणि मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, राज्यातील संकटात सापडलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा अवमान करण्याचे काम आमदारांनी केले आहे. हा शेतकऱ्यांचा एवढा मोठा अपमान आहे. सरकारकडून हा अपमान झाल्याचे आम्हाला वाटते. जर त्यांच्यावर कारवाई झाली नाही, तर सरकार या विधानाशी सहमत आहे का? सरकार सहमत नसेल, तर त्यांच्यावर कारवाई करावी. या दुःखात शेतकऱ्यांच्या डोळ्यांतील अश्रू दिसत असतील, शेतकऱ्यांबद्दल जाणीव असेल, तर त्यांच्यावर कारवाई करावी. सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे गायकवाड यांच्यावर त्वरित कारवाई करावी.

छठपूजेसाठी एक खिडकी योजना : मनपा आयुक्त अश्विनी भिडे यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

मुंबई – मुंबईत छठपूजेच्या उत्सवासाठी मुंबई महानगरपालिकेने विशेष नियोजन करावे. यासाठी छठपूजेदरम्यान भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गुरुवारी महापालिका आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. मुंबईत छठपूजेच्या उत्सवासाठी मुंबई महानगरपालिकेने विशेष नियोजन करावे. यासाठी छठपूजेदरम्यान भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गुरुवारी महापालिका आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला २० हून अधिक छठपूजा समित्यांचे

प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी विविध सूचना आणि मागण्या मांडल्या. त्यानुसार आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिले.

छठपूजा हा श्रद्धेचा आणि सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा उत्सव आहे. मुंबई महानगरपालिकेने छठपूजा स्थळांवर कृत्रिम तलाव, स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आदी सुविधा द्याव्यात. तसेच, एक खिडकी योजनेद्वारे परवानग्यांची प्रक्रिया सुलभ करून भाविकांची गैरसोय टाळावी. मुंबईची सर्वसमावेशक संस्कृती जपत छठपूजा उत्सव सुरक्षित आणि उत्साहात नक्कीच पार पडेल, असा विश्वास कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला. मुंबईतील मढ-मार्वे, जुहू चौपाटी, गिरगाव चौपाटी, दादर चौपाटी आणि बाणगंगा येथे छठपूजेसाठी मोठ्या संख्येने भाविक एकत्र येतात. जुहू चौपाटीवर सुमारे पाच लाख भाविक छठपूजेसाठी उपस्थित राहत असल्याने तेथे पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी बैठकीत करण्यात आली. सार्वजनिक स्वच्छतागृहे, कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोल्या, पिण्याचे पाणी तसेच इतर मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यावर समित्यांच्या प्रतिनिधींनी भर दिला.

त्र्यंबकेश्वरमध्ये भाविकांसाठी भव्य दर्शनपथ!

२७५ कोटींच्या विकासकामांना गती

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

नाशिक – बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर विकासकामांना वेग आला आहे. कुंभमेळ्यासाठी देशभरातून येणाऱ्या भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन त्र्यंबकेश्वर मंदिर परिसरात आधुनिक दर्शनपथ विकसित करण्यात येत आहे. भाविकांना सुलभ आणि सुरक्षित दर्शन घेता यावे, तसेच मंदिर परिसरातील गर्दीचे नियोजन करता यावे, हा या प्रकल्पामागील मुख्य उद्देश आहे. शासनाकडून त्र्यंबकेश्वरमधील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मंजूर करण्यात आलेल्या २७५ कोटी रुपयांच्या निधीतून हे काम केले जात आहे. बसस्थानकापासून मंदिरापर्यंत भाविकांना मिळणार सुविधा त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी आणि कुशावर्त कुंडात स्नान करण्यासाठी दररोज मोठ्या संख्येने भाविक येतात. सण, उत्सव आणि कुंभमेळ्याच्या काळात ही गर्दी अधिक वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मंदिर परिसरातील गर्दी नियंत्रित करणे, दर्शनाच्या रांगेत शिस्त राखणे आणि भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. मुख्य वाहनतळ आणि कुशावर्त कुंड येथून येणाऱ्या भाविकांना थेट मंदिराच्या दर्शनरांगेपर्यंत सुरक्षितपणे पोहोचता यावे, यासाठी दर्शनपथ विकसित केला जात आहे.

आशा सेविकांना ५ हजार सानुग्रह अनुदान जाहीर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

मुंबई – मुंबई मनपातंर्गत कार्यरत आशा स्वयंसेविकांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी पाच हजार रुपये सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याबाबत मुंबईच्या महापौर रितू राजेश तावडे यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना लेखी निर्देश दिले आहेत. मुंबई मनपातंर्गत कार्यरत आशा स्वयंसेविकांना दिवाळीनिमित्त प्रत्येकी पाच हजार रुपये सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याबाबत मुंबईच्या महापौर रितू राजेश तावडे यांनी महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना लेखी निर्देश दिले आहेत.

आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात महापौर रितू तावडे यांनी नमूद केले आहे की, मनपातंर्गत सद्यस्थितीत एकूण १,४६१ आशा स्वयंसेविका कार्यरत आहेत. या स्वयंसेविका अत्यंत अल्प मानधनावर आरोग्य सेवा, लसीकरण मोहीम तसेच विविध शासकीय लोककल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम करतात.

दिवाळीत सानुग्रह अनुदान देण्याबाबत या आशा स्वयंसेविकांचा विचार न होणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे या सर्व आशा स्वयंसेविकांना दीपावली सणानिमित्त प्रत्येकी ५,००० रुपयांचे सानुग्रह अनुदान तत्काळ मंजूर करून त्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश महापौरांनी प्रशासनाला दिले.

शेतकऱ्यांबाबतचं 'ते' वक्तव्य भोवलं, एकनाथ शिंदे संजय गायकवाडांवर संतापले, शिवसेनेतून निलंबित करणार?

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

मुंबई – वादग्रस्त वक्तव्यांसाठी कुप्रसिद्ध असणारे बुलढाण्यातली शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्यावर पक्षाकडून मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे.

आमदार संजय गायकवाड यांनी अलीकडेच शेतकऱ्यांबाबत बोलताना एक वादग्रस्त टिप्पणी केली होती. त्यांच्या या वक्तव्यानंतर टीकेची प्रचंड झोड उठली होती. यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गायकवाड यांच्यावर प्रचंड संतापले असून आता त्यांच्यावर निलंबनाची कारवाई होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

शेतकऱ्यांच्या प्रत्येक संकटात शिवसेना मदतीला धावून जाते. राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शिवसेनेने व्यापक मदत मोहीम सुरू केली आहे. शेतकरी कुटुंबांतील लाडक्या बहिणींना २५ हजार शिलाई मशिन्सचे वाटप केले जात आहे. शेतकऱ्यांच्या मुलींना २५ हजार सायकली दिल्या जात आहेत. दसरा मेळाव्यात शिवसेनेने १०० ट्रक अन्नधान्य दुष्काळग्रस्त भागात पाठवले आहे. गुरुवारी आणखी २४ ट्रक धान्य पाठवण्यात आले. शिवसेना शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ठोस काम करत असताना संजय गायकवाड यांच्या वादग्रस्त विधानामुळे शिवसेनेची प्रतिमा नाहक मलीन होत असल्याची पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची भावना आहे. शेतकरी आपला अन्नदाता असून त्याच्याविरोधातील कोणतीही विधाने खपवून घेतली जाणार नाहीत, अशी तंबी देत शिंदे संजय गायकवाड यांच्यावर शिवसेना पक्षातून निलंबनाची कारवाई करण्याचे आदेश एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

मतवारी दुष्काळाची! पर्यावरण मतपेटीत कधी उतरणार?

दुष्काळमुक्तीसाठी राजकीय इच्छाशक्ती आणि मतदारांच्या जागरुकतेची गरज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – दुष्काळावर मात करण्यासाठी डोंगरांचे संवर्धन, वृक्षारोपण, पाणी जमिनीत मुरवणे आणि बांबू लागवड यांसारखे उपाय महत्त्वाचे आहेत. अनेक गावांनी हे प्रयोग यशस्वी करून दाखवले आहेत. मात्र, अशा उपाययोजनांचा राज्यव्यापी कार्यक्रम का होत नाही, असा प्रश्न उपस्थित होतो. पर्यावरण हा राजकीय अजेंड्यावरील महत्त्वाचा विषय नसल्याने दीर्घकालीन उपायांकडे दुर्लक्ष होत असल्याचे मत पाशा पटेल यांनी व्यक्त केले आहे.

दुष्काळाच्या काळात टँकर, चारा छावण्या, कर्जमाफी आणि पीकविमा यांवर चर्चा होते. संकटग्रस्तांना तातडीची मदत देणे आवश्यक असले, तरी भविष्यात दुष्काळ टाळण्यासाठी काय करणार, किती डोंगर हिरवे करणार आणि किती पाणी जमिनीत मुरवणार, याबाबत राजकीय पक्षांकडून ठोस भूमिका मांडली जात नाही. मतदारांनीही उमेदवारांना या प्रश्नांची उत्तरे विचारण्याची गरज आहे. १९७२ च्या दुष्काळानंतर महाराष्ट्राने रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. त्याचप्रमाणे आज हवामान बदल आणि दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे. आगामी निवडणुकांमध्ये मतदारांनी उमेदवारांना आपल्या परिसरातील डोंगर हिरवे करण्यासाठी काय योजना आहेत, पाणी जमिनीत मुरवण्यासाठी कोणते उपाय करणार आणि गावातील तलावांमधील गाळ कधी काढणार, असे प्रश्न विचारावेत. राजकीय पक्षांनीही दुष्काळ निवारण आणि हवामान बदलासंदर्भातील स्वतंत्र आराखडा जाहीर करून त्याच्या अंमलबजावणीचा वार्षिक हिशेब जनतेसमोर मांडावा. दुष्काळ आणि तापमानवाढ हे प्रश्न मतपेटीत उतरले, तरच ते धोरणांमध्ये प्राधान्याने येतील. अन्यथा, दर काही वर्षांनी नागरिकांना पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभे राहावे लागेल, असा इशारा पाशा पटेल यांनी दिला आहे.

भूतानमध्ये हिमनदी सरोवराचा उद्रेक

उत्तर बंगालमधील दुआर्स परिसराला सतर्कतेचा इशारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

नागपुर – भूतानमध्ये हिमनदीच्या सरोवराचा उद्रेक झाल्याचे वृत्त समोर आल्यानंतर उत्तर बंगालमधील दुआर्स प्रदेशातील काही भागांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शुक्रवारी हा इशारा जारी करण्यात आल्याची माहिती पश्चिम बंगालमधील अधिकाऱ्यांनी दिली. विशेषतः संकोश नदीच्या किनारी असलेल्या भागांवर प्रशासन लक्ष ठेवून आहे. संकोश नदी परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा पश्चिम बंगालमधील अलिपूरद्वार जिल्ह्यातील कुमारग्रामसह दुआर्स परिसरातील संकोश नदीच्या आसपासच्या भागांवर अधिकारी बारकाईने लक्ष ठेवून आहेत. पश्चिम बंगालचे गृह आणि डोंगराळ भागाचे राज्यमंत्री विशाल लामा यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुआर्समधील काही भागांत, विशेषतः संकोश नदीजवळ सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, भूतानमधील गासा जिल्ह्यात वाकिला पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या शिंताफू हिमनदी सरोवरात हा उद्रेक झाल्याचे भूतानी प्रसारमाध्यमांनी म्हटले आहे.

दादर रेल्वे स्थानकाला पुन्हा एकदा फेरीवाल्यांचा विळखा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – मुंबईतील फेरीवाल्यांना क्यु आर कोड आधारीत ओळखपत्र देण्यात आल्यानंतर रेल्वे स्थानकापासून दीडशे मीटर परिसर वगळता पुढे फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात आली आहे. परंतु दीडशे मीटरच्या पुढे फेरीचा व्यवसाय करण्यास मान्यता असतानाही दीडशे मीटरच्या आतमध्येच आता मोठ्याप्रमाणात फेरीवाले व्यवसाय करता दिसत आहे. या फेरीवाल्यांनी चक्क दादर रेल्वे स्थानकाला पुन्हा एकदा विळखा घातलेला असून स्थायी समितीच्या बैठकीत आठ दिवसांपूर्वी ही बाब स्थानिक नगरसेवक यशवंत किल्लेदार यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही पोलिस आणि महापालिका प्रशासन मात्र ढिम्मच असल्याचे दिसून येत आहे.

नेरळ-माथेरान 'मिनी ट्रेन' आजपासून पुन्हा धावणार, बघा वेळापत्रक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – पावसाळ्यात सुरक्षिततेच्या कारणामुळे जून ते ऑक्टोबर या कालावधीत नेरळ–माथेरान रेल्वेसेवा बंद ठेवण्यात आली होती. आता शुक्रवारपासून नेरळ–माथेरान मिनी ट्रेन सेवा पुन्हा सुरू होणार आहे. माथेरान आणि अमन लॉजदरम्यान धावणाऱ्या शटल सेवाही नियोजित वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहेत.

नेरळहून माथेरानला जाणारी पहिली गाडी सकाळी ८.५० वाजता सुटून ११.३० वाजता माथेरानला पोहोचेल. दुसरी गाडी सकाळी १०.२५ वाजता सुटून दुपारी १.०५ वाजता माथेरानला पोहोचेल. परतीच्या प्रवासासाठी माथेरानहून दुपारी २.४५ आणि ४ वाजता गाड्या सुटतील. त्या अनुक्रमे सायंकाळी ५.३० आणि ६.४० वाजता नेरळला पोहोचतील. या मार्गावरील दोन्ही गाड्या सहा डबे असणार आहेत. यामध्ये तीन द्वितीय श्रेणीचे, एक विस्टाडोम डबा आणि दोन द्वितीय श्रेणी–सह–सामान डबे यांचा समावेश असेल.

उजनीच्या पाण्यावर डेटा सेंटरचा डोळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

आमदार रोहित पवार यांचा सवाल

पुणे – उजनी धरण परिसरात प्रस्तावित असलेल्या एआय डेटा सेंटर आणि अणुऊर्जा प्रकल्पांसाठी एकूण तब्बल ९ टीएमसी पाणी वापरले जाणार असल्याचा दावा आमदार रोहित पवार यांनी केला आहे. या प्रकल्पांमुळे उजनीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या साडेपाच लाख शेतकरी आणि ३० हजार मच्छिमार कुटुंबांच्या रोजगारावर तसेच अर्थकारणावर गंभीर परिणाम होण्याची भीती त्यांनी गुरुवारी व्यक्त केली. उजनीतील एआय डेटा सेंटर हा विकास आहे की विनाश? असा सवाल उपस्थित करत त्यांनी स्थानिक नागरिकांच्या पाण्याच्या गरजांबाबत चिंता व्यक्त केली. दिवंगत नेते यशवंतराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीतून उभारण्यात आलेल्या उजनी धरणामुळे हजारो एकर शेतजमीन सिंचनाखाली आली आहे. राज्य सरकारकडून उजनी परिसरात दोन हजार मेगावॉट क्षमतेचा तरंगता सौरऊर्जा प्रकल्प आणि ४५० मेगावॉट क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन असल्याचे पवार यांनी सांगितले. या प्रकल्पांसह डेटा सेंटरच्या माध्यमातून सुमारे १ लाख ६५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याचे सांगितले जात आहे.

दुभत्या जनावरांसाठी सरकारी चारा पुरणार नाही, त्यात वाढ करावी : तानाजी सावंतांची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

धाराशिव – राज्यात दुष्काळाची भीषण दाहकता दिवसागणिक अधिक तीव्र होत आहे. या दुष्काळाचा फटका माणसांप्रमाणेच पशु–पक्षांसह दुभत्या जनावरांनाही बसतो आहे.

अशातच दुभत्या जनावरांसाठी सरकार देणार असलेला चारा पुरणार नाही, सरकारने चारा वाढवून द्यावा, अशी मागणी शिवसेनेचे आमदार तानाजी सावंत यांनी केली आहे. सरकारने चारा वाढ केली नाही, तर तानाजी सावंत मतदारसंघात स्वतः मोफत चारा वाटप करणार अशी घोषणाही त्यांनी केली आहे. सोबतच चाऱ्या अभावी एकही जनावर विकले जावू देणार नाही, असाही शब्द आमदार तानाजी सावंतांकडून शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतरही मायक्रो फायनान्स कंपन्यांनी वसुली थांबवली नाही, तर बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या स्टाईलने हिसका दाखवू असं म्हणत मायक्रो फायनान्स कंपन्यांना देखील आमदार तानाजी सावंत यांनी इशारा दिला आहे. दिवाळीसाठीची पाच हजारांची मदत २४ तासात शेतकऱ्यांच्या खात्यावर पडेल, तर दिवाळीनंतर मुख्यमंत्री भरीव मदतीची घोषणा करतील असेही तानाजी सावंत म्हणाले.

एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर शिवसेना नेते दुष्काळग्रस्तांसाठी मदत घेऊन बांधावर जात आहेत. अशातच आमदार तानाजी सावंतांकडून भूम परंडा वाशी भागात दिवाळीसाठी मदतीचे वाटप केले जाणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.